# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**बामणी (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील पोलीस अधिकाऱ्यांनी लाच घेतल्याबाबत**

**(१) ३२५६९ (०७-०१-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बामणी (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यांनी अवैध रेती वाहतूक व डिझेलच्या टाक्या घेऊन जाणाऱ्या व कोणतीही नंबर प्लेट नसलेल्या वाहनांवर कोणतीच कारवाई न करता लाच घेऊन सोडून दिल्याची तक्रार दिनांक २६ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे नोंदविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी यांच्या आशिर्वादाने अवैध दारु विक्री, जुगार, अवैध व्यवसाय चालू असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२५-०२-२०२२) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जिंतूर यांचेमार्फत करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीत बामणी पोलीस स्टेशनचे तत्कालिन सहायक पोलीस निरीक्षक यांचेबाबत तक्रारीतील नमूद बाबी सिध्द झाले नसल्याने सदर तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेट्रो-३ च्या कारशेडसाठी आरेतील झाडे कापण्यासंदर्भातील आंदोलकांचे गुन्हे मागे न घेतल्याबाबत**

**(२) ३२६१४ (०७-०१-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेट्रो-३ च्या कारशेडसाठी आरेतील झाडे कापण्यात येत असताना पर्यावरणप्रेमी तरुणांनी उत्स्फूर्तपणे पुकारलेल्या आंदोलनात २९ जणांना अटक करुन त्यांच्यावर माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हे दाखल करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरे मधील कारशेड रद्द करुन आंदोलकांवर गुन्हे मागे घेण्याची घोषणा मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी केली असता त्यास एक वर्षे होऊनही अद्याप गुन्हे मागे घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाच्या दिरंगाईमुळे अनेक तरुणांच्या परदेशातील शिक्षण व रोजगार या संधीवर मुकावे लागले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू गुन्हे मागे न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच सदरहू आंदोलकांवरील गुन्हे विनाविलंब मागे घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२८-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) याप्रकरणी आरे पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.क्र.१८१/१९ शासनाने मागे घेण्याचा निर्णय घेतला असून तसे दिनांक ५/०७/२०२१ च्या शासन पत्रान्वये पोलिस महासंचालक, मुंबई यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार मा. न्यायालय ६८ वे, बोरीवली, मुंबई यांनी दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार आरे मेट्रो कार शेड विरोधी आंदोलकांवरील खटले मागे घेण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पोलिस पाटलांची मोठ्या प्रमाणावर गेल्या चार वर्षापासून रिक्त असलेली पदे भरण्याबाबत**

**(३) ३२६७१ (०७-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचा महसूल विभाग व पोलिस प्रशासन यांच्यातील महत्वाचा दुवा म्हणून गावांतील घटना व घडामोडीची माहिती वेळोवेळी देण्याचे काम गावपातळीवर पोलिस पाटील करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात एकूण ३८ हजार ७१२ पोलिस पाटलांची मंजूर पदे असून त्यापैकी १२ हजार ४२२ पोलिस पाटलांची पदे गेल्या चार वर्षापासून रिक्त असल्याचे दिनांक १३ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलिस पाटलांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्यामुळे एकाच पोलिस पाटलावर एकाच वेळी तीन ते चार गावांचा प्रभार देण्यात आला असल्यामुळे पोलिस पाटीलांवरील कामाच्या ताणामुळे नागरीकांनाही त्रास सहन करावा लागत असल्याचेही गेल्या चार वर्षापासून ते आजतागायत निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त रिक्त पदे तातडीने भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२४-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यात एकूण पोलीस पाटलांची मंजूर पदे ३८५३० असून १४१५८ इतकी पदे रिक्त आहेत.
(३) काही गावांमध्ये शासन निर्देशानुसार निश्चित आरक्षणाच्या पदावर संबंधित प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्याने तसेच नियत वयोमानाने सेवानिवृती व निधन झाल्याने, राजीनामा यामुळे पोलीस पाटील पद रिक्त असलेल्या गावांचा अतिरिक्त कार्यभार शेजारच्या गावातील पोलीस पाटलांकडे देण्यात आलेला आहे.
(४) पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कार्यवाही सुरू असून पोलीस पाटील संवर्ग सुधारित बिंदूनामावली तपासून अद्ययावत करण्याचे काम प्रगतीपथावर असून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मुद्रांक शुल्क कर्मचा-यांच्या संपाबाबत

**(४) ३२७८१ (०६-०१-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुद्रांक शुल्क कर्मचा-यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास संप पुकारला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संप करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, संप मिटविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. बाळासाहेब थोरात (०२-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नोंदणी व मुद्रांक विभागातील सर्व संवर्गातील मागील पाच ते सहा वर्षापासून रखडलेल्या पदोन्नत्या त्वरीत करणे, विभागातील सर्व रिक्त पदे तात्काळ भरणे, सेवाजेष्ठता याद्या अंतिम करुन प्रसिध्द करणे, आय-सरिता-ई फेरफार तसेच इतर सर्व्हरच्या अडचणी तात्काळ दूर करणे इ.

(३) नोंदणी व मुद्रांक विभागातील, अराजपत्रित अधिकारी व कर्मचारी संघटना पदाधिकारी (महाराष्ट्र राज्य) यांनी विविध निवेदनांव्दारे शासनास दिलेल्या मागण्यांबाबत, दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी मा.अपर मुख्य सचिव (महसुल, नोंदणी शुल्क व मुद्रांक) यांचे दालनात संघटनेच्या पदाधिका-यांसमवेत बैठक संपन्न झाली. बैठकीमध्ये संघटनेच्या पदाधिका-यांनी उपस्थित केलेल्या मागण्यांवर चर्चा करण्यात येवून शासन स्तरावर सकारात्मक निर्णय घेवून कार्यवाही करण्यात येईल अशी खात्री देण्यात आली.

सद्य:स्थितीत दुय्यम निबंधक श्रेणी-१ ते सह दुय्यम निबंधक वर्ग-२ तसेच सह दुय्यम निबंधक वर्ग-२ ते सह जिल्हा निबंधक वर्ग-१ यांचे पदोन्नतीचे प्रस्तावाबाबत कार्यवाही चालू आहे तसेच विभागातील इतर पदोन्नतीबाबतही कार्यवाही चालू असून आय-सरीता व ई-फेरफार संबंधाने अडचण दूर करण्याबाबत प्रकल्प अंमलबजावणी समितीमार्फत कार्यवाही चालू आहे.

---

**राज्यात ऑनलाईन ७/१२ प्रमाण जमिनीचा फेरफार ऑनलाईन मिळण्याबाबत**

**(५) ३२९४४ (१०-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर)** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सातबारा प्रमाणे जमिनीचा फेरफार ऑनलाईन देणार असल्याचे दिनांक १ ऑक्टोंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनाने जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने जाहिर केल्याप्रमाणे ऑनलाईन ७/१२ च्या धर्तीवर जमिनीचा फेरफार ऑनलाईन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२१-०२-२०२२) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

शासनाने दिनांक ०१/०८/२०२१ पासून डिजिटल स्वाक्षरीत फेरफार ऑनलाईन उपलब्ध करुन दिले असल्याचे जाहिर केले आहे.

(२) होय.

राज्यातील संगणकीकृत ऑनलाईन ७/१२ प्रमाणे फेरफार नोंदविण्याची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली असून, हस्तलिखित फेरफार नोंदविण्याची प्रक्रिया संपूर्ण राज्यात बंद करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदपूर (जि.लातूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्गासाठी संपादीत केलेल्या जमिनींचा योग्य मोबदला मिळण्याबाबत**

**(६) ३३०५३ (०६-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) तालुक्यातील एकूण १५० शेतकऱ्यांच्या जमिनी रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्गाकरीता संपादित करण्यात आल्यामुळे तेथील उपजिल्हाधिकाऱ्यांनी खरेदी खताच्या आधारे सरासरी २९०२ रुपये प्रती चौरस मीटर भाव निश्चित केल्यामुळे हायवे प्राधिकरणाने आक्षेप घेतला व हे प्रकरण लवादाकडे सुपूर्द करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित जिल्हाधिकारी हे लवादाचे प्रमुख असतात व तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी दोन्ही बाजूच्या पुराव्यांचा अभ्यास न करता शेतकऱ्यांच्या जमिनीला ६७९ रुपये प्रती चौरस मिटर असा अत्यंत कमी दर निश्चित करुन शेतकऱ्यांवर अन्याय केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी निषेधार्थ संबंधित शेतकऱ्यांनी आधी ठरविलेल्या खरेदी खताच्या आधारे निश्चित केलेला २९०२ रुपये दर प्रती चौरस मिटर देण्याची मागणी करुन दिनांक २८ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास काम बंद करुन तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२४-०२-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदरील प्रकरणात तत्कालीन जिल्हाधिकारी, लातूर यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकुण घेऊन उपलब्ध पुरावे विचारात घेऊन प्रकरणपरत्वे रू. ६७९/-, रू. १३१०/- व रू.१४००/- प्र.चौ.मी. दर निश्चित केला आहे.

(३) (४), व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किसान ॲपवरील माहिती शेतकऱ्यांना वेळीच मिळत नसल्याबाबत**

**(७) ३३०६२ (०६-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिकतेचे ज्ञान प्राप्त होण्यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी "किसान ॲप" सुरु केले असुन किसान ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना हवामान, अतिवृष्टी, वातावरणाची माहिती, पीक पाणी, पिकांवरील रोगराई यासाठी करावयाचे नियोजन आदिं माहितीचे संदेश सदर ॲपवरुन शेतकऱ्यांना देण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत किसान ॲपच्या माध्यमातून उशिराने म्हणजेच मौसम संपल्यानंतर संदेश मिळत असल्याच्या तक्रारी चाकूर तालुक्यातील (जि.लातूर) शेतक-यांनी शासनाकडे केल्या असल्याचे दिनांक २१ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त माहिती उशिरा येत असल्याच्या तक्रारी येत असुन वरिष्ठांना याची माहिती देऊन पूर्वीप्रमाणे संदेश येण्यासाठी प्रयत्न करतील असे तालुका कृषी अधिकारी, चाकूर यांच्याकडून सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी किसान ॲपवरील संदेश वेळीच मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे (२२-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

कृषि विभागामार्फत किसान ॲप नावाचे कोणतेही ॲप्लीकेशन कार्यरत नाही. तथापि, केंद्र शासनाचे एम किसान पोर्टल राज्य शासन व केंद्र शासनामार्फत संदेश सेवेकरिता वापरले जाते.

(२) हे खरे नाही

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौ.नळेगांव (ता.चाकूर, जि.लातूर) येथे भूजल सर्वेक्षण यंत्रणेच्या चुकीच्या सर्व्हेक्षणानुसार तीन लाभार्थ्यांना एकत्रित सिंचन विहिर खोदण्याबाबत**

**(८) ३३०६३ (१०-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून वैयक्तिक नवीन सिंचन विहिरी खोदण्यासाठी शासनाकडून लाभार्थ्यांना तीन लाख रुपये इतका निधी दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५ या कालावधीत भूजल सर्व्हेक्षण यंत्रणेने चुकीच्या पध्दतीने केलेल्या सर्व्हेक्षणानुसार, क्रीटीकल व सेमी क्रीटीकल झोन निर्माण केल्यामुळे मौ.नळेगांव (ता.चाकूर, जि.लातूर) परिसरातील ९ गांवे क्रीटीकल झोनमध्ये दाखविल्याने सेमी क्रिटीकल झोनमधील गावांत मनरेगाच्या वैयक्तिक विहिरींचा लाभ देण्यासाठी शेतकरी लाभार्थ्यांना अडचणी निर्माण झाल्याचे दिनांक २८ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूजल सर्व्हेक्षण यंत्रणेच्या सर्व्हेक्षणानुसार, जिथे सेफ झोन आहे तेथे विहिरींना परवानगी देऊन संभावित विहिरींच्या अंतरावर ५०० फुटांवर दुसरी विहिरी नसावी अशीही अट घातल्यामुळे अनेक गावांमध्ये तर विहिरीच न घेणे असे सुचविण्यात आले असून जेथे विहिरीला परवानगी देण्यात आले असून तेथे सामुहिक विहिर म्हणजे तीन शेतकऱ्यांमध्ये एकत्रित विहिरीस परवानगी दिल्यामुळे मौ.नळेगावांसह तालुक्यातील अनेक गावांतील शेतकऱ्यांना विहिरींच्या लाभापासून वंचित राहण्याची पाळी आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त सर्व्हेक्षण यंत्रणेने चुकीच्या पध्दतीने केलेल्या सर्व्हेक्षणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले आहे,

(५) असल्यास, शेतकऱ्यांना मनरेगा योजनेअंतर्गत पूर्ववत लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संदीपानराव भुमरे (२८-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाने दिलेल्या कार्यप्रणालीनुसार संपूर्ण देशाचे भूजल मुल्यांकन करण्यात येते. राज्याचा भूजल अंदाज हे केंद्रीय भूमीजल मंडळ, नागपूर व भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा यांचेद्वारे संयुक्तरित्या करण्यात येते. भूजल मुल्यांकन २०१५ या कार्यप्रणालीनुसार करण्यात आले असून याला जल संसाधन मंत्रालय, नवी दिल्ली यांची मान्यता मिळालेली

आहे. प्रस्तुत सर्व्हेक्षणानुसार सदर ग्रामपंचायत अतिशोषित असल्यामुळे तेथील वैयक्तिक सिंचन विहिरीच्या लाभार्थ्यांना लाभ देण्यास अडचणी येत असल्याची बाब खरी आहे.

(३) हे खरे आहे.

शासन निर्णय दि.२१/८/२०१४ अन्वये, प्रस्तावित विहिरीच्या ५०० मीटर परिसरात पेयजल स्त्रोत नसल्याची खात्री झाल्यानंतरच दोन विहिरीतील किमान अंतर १५० मीटर ठेवावे, अशी तरतूद आहे. तसेच, भूजल सर्व्हेक्षण यंत्रणा (GSDA) च्या व्याख्येप्रमाणे सेमीक्रिटीकल, क्रिटिकल व ओव्हर एक्स्प्लॉयटेड क्षेत्रामध्ये वैयक्तिक लाभाची विहिर अनुज्ञेय नाही. मात्र, या भागात समूह विहिरी हाती घेता येऊ शकतात. असा समूह तयार करतांना किमान ३ शेतकऱ्यांचा समूह असावा व समुहातील शेतकऱ्यांनी करारनामा करुन उपलब्ध होणारे पाणी प्रमाणात वापरतील असे असे प्रमाणित करावे, अशी तरतूद आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहमदपूर (जि.लातूर) येथे मंजूर झालेल्या सिंचन विहिरींचे कार्यारंभास आदेश न देण्याबाबत

**(९) ३३०६६ (०७-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) येथे सिंचन विहिरींचे १०९ प्रस्ताव शासनाने मंजूर केले त्यापैकी फक्त ५९ प्रस्तावाचे कार्यारंभ आदेश आल्याचे व उर्वरित ५० सिंचन विहिंरीचे प्रस्ताव अद्‌याप प्रलंबित ठेवल्याचे दिनांक १९ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विहिरींची खोदकामे करावी लागतात व पावसाळ्यात विहिरींची खोदकामे करत नसल्याने सदर प्रलंबित विहिरींचे प्रस्ताव गटविकास अधिकारी, अहमदपूर यांचेकडे मान्यतेसाठी व कार्यारंभ आदेश देण्यासाठी मागील दोन महिन्यांपासून पडून असल्याचे माहे नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त १०९ सिंचन विहिरींचे प्रस्ताव मंजूर असतांना त्यापैकी ५९ विहिरींच्या प्रस्तावाची कार्यारंभ आदेश देण्याचे व सारा, आनंदवाडी, केंद्रेवाडी, वळसंगी, कोपरा व उन्नी आदिं गावांतील ५० प्रस्ताव अद्‌याप प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याप्रकरणी प्रलंबित असलेल्या प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संदीपानराव भुमरे (२८-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

अहमदपूर तालुक्यातील १०९ सिंचन विहिरींचे प्रस्ताव मंजूर केलेले आहेत. त्यापैकी माहे-२०२१ दरम्यान ग्रामपंचायतीकडून कार्यारंभ आदेश मागणी करण्यात आल्यामुळे ६९ सिंचन विहिरींचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानंतर सोरा, आनंदवाडी व केंद्रेवाडी येथील एकूण १५ सिंचन विहिरींना दि.२१ मे, २०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले

आहेत. अशाप्रकारे एकूण (६९+१५=८४) विहिरींना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. कोपरा येथील १० सिंचन विहिरींना दि.७ जुलै, २०२१ रोजी प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे, तथापि अद्याप ग्रामपंचायतीकडून मागणी प्राप्त झालेली नसल्याने कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नाहीत. तर वळसंगी-१० व उन्नी-५ सिंचन विहिरींच्या मंजूरीसाठी ग्रामपंचायतीकडून अद्याप ग्रामसभा इतिवृत्त प्राप्त झालेले नसल्याने मंजूरी प्रलंबित आहे.

(२) हे खरे आहे.

दि.७/७/२०२१रोजी कोपरा येथील १० सिंचन विहिरींना मंजूरी देण्यात आली आहे. तथापि, त्या काळात पर्जन्य परिस्थिती असल्याने व ग्रामपंचायतीकडून काम मागणी प्राप्त झाल्याचे कळविण्यात आलेले नसल्यामुळे कार्यारंभ आदेश देणे प्रलंबित आहे. मौजे वळसंगी व उन्नीच्या सिंचन विहिरींसाठी ग्रामपंचायतीकडून ग्रामसभेचे इतिवृत्त प्राप्त न झाल्याने सदर विहिरींना अद्याप मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही.

(३) अहमदपूर तालुक्यातील १०९ सिंचन विहिरींचे प्रस्ताव मंजूर केलेले आहेत. त्यापैकी माहे-२०२१ दरम्यान ग्रामपंचायतीकडून कार्यारंभ आदेश मागणी करण्यात आल्यामुळे ६९ सिंचन विहिरींचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानंतर सोरा, आनंदवाडी व केंद्रेवाडी येथील एकूण १५ सिंचन विहिरींना दि.२१ मे, २०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. अशाप्रकारे एकूण (६९+१५=८४) विहिरींना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. कोपरा येथील १० सिंचन विहिरींना दि.७ जुलै, २०२१ रोजी प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे, तथापि अद्याप ग्रामपंचायतीकडून मागणी प्राप्त झालेली नसल्याने कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नाहीत. तर वळसंगी-१० व उन्नी-५ सिंचन विहिरींच्या मंजूरीसाठी ग्रामपंचायतीकडून अद्याप ग्रामसभा इतिवृत्त प्राप्त झालेले नसल्याने मंजूरी प्रलंबित आहे.

(४) मौजे वळसंगी व उन्नीच्या सिंचन विहिरी मंजूरीसाठी ग्रामसभेचे इतिवृत्त सादर करण्याबाबत ग्रामपंचायतीस सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) मौजे कोपरा येथील १० सिंचन विहिरींना मंजूरी देण्यात आली आहे. तथापि, त्या काळात पर्जन्य परिस्थिती असल्याने व ग्रामपंचायतीकडून काम मागणी प्राप्त झाल्याचे कळविण्यात आलेले नसल्यामुळे कार्यारंभ आदेश देणे प्रलंबित आहे.

मौजे वळसंगी-१० व मौजे उन्नी-५ सिंचन विहिरींसाठी ग्रामपंचायतीकडून ग्रामसभेचे इतिवृत्त प्राप्त न झाल्याने सदर विहिरींना अद्याप मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही.

---

## वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात उपद्रक असल्यामुळे शेतक-यांना शेती संरक्षण बंदुका देण्यात आल्याबाबत

**(१०) ३३१३७ (०७-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी, भूदरगड, आजरा, चंदगड, गगनबावडा व शाहूवाडी (जि.कोल्हापूर) या तालुक्यांमध्ये वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात उपद्रव होत असल्यामुळे शेतकऱ्यांना ४० ते ५० वर्षापुर्वी तत्कालीन शासनाने शेती संरक्षणाकरीता बंदुका देण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील संरक्षण बंदुका ज्या शेतक-यांच्या नावे आहेत ते शेतकरी वयोमानानुसार बंदुका चालविण्यास असमर्थ आहेत किंवा ज्यांच्या बंदुक परवान्यांचा कालावधी

संपला असून सर्व बंदुका वारसांच्या नावे करण्याबाबत गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडेही बैठकीचे आयोजन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवदनाव्दारे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जिल्ह्यातील बंदुक धारकांच्या शेती संरक्षण बंदुका या वारसांच्या नावे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२३-०२-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) शस्त्र नियम, २०१६ मधिल अनुसुची II अनुक्रमांक ४ अन्वये शस्त्र परवाना देण्याचे अधिकार जिल्हादंडाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार कोल्हापूर जिल्ह्यातील शेती संरक्षणाकरीता यापूर्वी देण्यात आलेले शस्त्र परवाने शस्त्र नियम, २०१६ मधिल नियम क्र. २५ अन्वये शस्त्र परवानाधारकाच्या कायदेशीर वारसास शस्त्र परवाना मंजूर करण्याबाबत विहित केलेल्या तरतुदी नुसार तातडीने कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर यांना दि. २१.१०.२०२१ च्या पत्रान्वये देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र पोलीस दलातील थकबाकीची रक्कम अदा न करण्यात आल्याबाबत**

**(११) ३३२६४ (०६-०१-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र पोलीस दलातील आणि रेल्वे पोलीस दलातील सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी तसेच पोलीस कर्मचाऱ्यांना गेल्या दोन वर्षापासून आजमितीस सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची रक्कम तसेच सातव्या वेतन आयोगाचे निवृत्ती वेतन मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणे प्रलंबित असल्याच्या तक्रारी पोलीस महासंचालक यांचेकडे सातत्याने करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सातव्या वेतन आयोगाचे निवृत्ती वेतन विनाविलंब अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२३-०२-२०२२) :** (१) व २) होय, हे खरे आहे.
(३) सातव्या वेतन आयोगाचे निवृत्तीवेतन विनाविलंब अदा करण्याबाबत दि.१२.०५.२०२०, दि.२५.०६.२०२० व दि. ०७.०५.२०२१ हे शासन निर्णय वेळोवेळी निर्गमित करण्यात आले आहेत. पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाच्या स्तरावर दोन वेतन पडताळणी पथकांची स्थापना करण्यात आली असून दि.३१.१२.२०२१ च्या गृह विभागाच्या शासन निर्णयान्वये सदर पथकांना दि.३०.६.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. उपरोक्तनुसार सेवानिवृत्त पोलिस अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवापुस्तकांची पडताळणी करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊनच्या काळात कमी उपस्थितीमुळे वेतन पडताळणी पथकास सादर केलेल्या महाराष्ट्र पोलिस दलातील पोलिस अधिकारी/ कर्मचाऱ्यांची सातव्या वेतन आयोगानुसार सेवापुस्तकांची पडताळणी वेळेवर होऊ शकली नाही. तसेच महालेखापाल कार्यालयास सादर केलेली प्रकरणेही मंजूर होण्यास विलंब झाला आहे.

---

**भुसावळ (जि.जळगांव) तालुक्यातील उपविभागीय अधिकारी यांच्या मनमानी कारभाराबाबत**

**(१२) ३३३१७ (०७-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) येथे रामसिंग सुलाणे, उपविभागीय अधिकारी यांच्या मनमानी कारभारासंदर्भात चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान पासुन वारंवार लेखी निवेदनाद्वारे महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२५-०२-२०२२) :** (१), (२) व (३) उप विभागीय अधिकारी, भुसावळ जि.जळगाव यांच्या विरुध्द चौकशी करुन कारवाई करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनधीनी दि.२८.०७.२०२१ च्या निवदेनाद्वारे केलेली आहे. सदर तक्रारीची चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त यांना दि.२८.१०.२०२१ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे. या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक यांची उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन) जळगांव यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी करण्याकरिता पथकाची नियुक्ती केलेली आहे. यासंदर्भात नियुक्त पथकानी केलेल्या तपासणीत आढळून आलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, भुसावळ यांच्या विरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त स्तरावरुन दि.१९/०१/२०२२ रोजी जिल्हाधिकारी, जळगांव यांना देण्यात आलेल्या आहेत. याबाबत विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर प्रचलित धोरणानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुक्ताईनगर विधानसभा मतदार संघातील बोदवड (जि. जळगांव) येथे शेतक-यांना ठिंबक सिंचन योजनेतंर्गत अनुदानाचा लाभ मिळण्याबाबत**

**(१३) ३३३३६ (०७-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर विधानसभा मतदार संघातील बोदवड (जि. जळगांव) येथे शेतक-यांना ठिंबक सिंचन योजनेतंर्गत ८० टक्के अनुदानाचा लाभ मिळण्याबाबत कृषि मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवदेनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे (२८-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) राज्यातील सर्व तालुक्यातील शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनाकरिता प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेच्या अनुदानाव्यतिरिक्त मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेतून पूरक अनुदान देण्यात येते.

शासन निर्णय दि. १८ नोव्हेंबर, २०२१ अन्वये मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेमध्ये बोदवड तालुक्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना व मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना यांचा एकत्रित लाभ देऊन बोदवड तालुक्यातील अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकऱ्यांना ८०% अनुदान व इतर शेतकऱ्यांना (५ हेक्टरच्या मर्यादेत) ७५% अनुदान देण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरुर (जि.पुणे) येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व उरुळी कांचन येथे नवीन पोलीस स्टेशन मंजूरीबाबत**

**(१४) ३३४४४ (०७-०१-२०२२). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर (जि.पुणे) येथील उविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय (SDPO) व हवेली तालुक्यातील उरुळी कांचन येथे नवीन पोलीस स्टेशन होण्याबाबत प्रस्ताव उच्चस्तरीय अधिकारी समितीकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिरुर उविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय (SDPO) व हवेली तालुक्यातील उरुळी कांचन येथे नवीन पोलीस स्टेशन होण्याबाबतचा प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०२-०३-२०२२) :**(१) व (२) उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार पोलीस अधीक्षक, पुणे (ग्रामीण) यांच्या आस्थापनेवर अनुक्रमे दौंड पोलीस उप विभागाचे विभाजन करून नवीन शिरुर पोलीस उप विभागीय अधिकारी कार्यालय व लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे विभाजन करून नवीन ऊरळीकांचन पोलीस ठाणे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना वैयक्तिक सिंचन विहिर योजना घेण्यास अडचणी येत असल्याबाबत**

**(१५) ३३४४८ (०७-०१-२०२२). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत वैयक्तिक-सामूहिक लाभाच्या सिंचन विहिरींची योजना राबविली जाते तसेच भूजल सर्व्हेक्षणानुसार सिंचन विहिर करण्यासाठी सुरक्षित वर्गवारीमध्ये एका व्यक्तीच्या नावे वैयक्तिक सिंचन विहिर करण्याकरिता प्रस्ताव सादर करता येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरुर तालुक्यातील अंशत: शोषित अर्ध गंभीर (Semi Critical) वर्गवारीतील गावांमध्ये वैयक्तिक विहिर घेण्यास परवानगी नसून तीन शेतकऱ्यांचा समूह करुन एक सामुहिक विहीर मंजूर करता येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या भूजल यंत्रणा सर्वेक्षणानुसार शिरुर तालुक्यातील ९३ ग्रामपंचायतींपैकी फक्त चार गावे सुरक्षित क्षेत्रात येत असून वैयक्तीक सिंचन विहिरीचा लाभ त्यांच्या होणार आहे, तसेच वरिष्ठ भूवैज्ञानिक पुणे यांच्या दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्रानुसार शिरुर तालुक्यातील अंशत: शोषित यादीमधील गावांमध्ये वैयक्तिक सिंचन विहिरीचा कार्यक्रम राबविता येत नसून तीन शेतकऱ्यांचा समूह एकत्रित येण्यास अडचणी येत असल्याने प्रस्ताव दाखल होण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गरीब शेतकऱ्यांना वैयक्तिक सिंचन विहिंरीचा लाभ मिळणे अवघड होत असल्याने यापूर्वी ज्याप्रमाणे वैयक्तिक सिंचन कार्यपध्दती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०२-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

भूजल सर्व्हेक्षण यंत्रणा (GSDA) च्या व्याख्येप्रमाणे सेमीक्रिटीकल, क्रिटिकल व ओव्हर एक्स्प्लॉयटेड क्षेत्रामध्ये वैयक्तिक लाभाची विहिर अनुज्ञेय नाही. मात्र, या भागात समूह विहिरी हाती घेता येऊ शकतात. असा समूह तयार करतांना किमान ३ शेतकऱ्यांचा समूह असावा व समुहातील शेतकऱ्यांनी करारनामा करुन उपलब्ध होणारे पाणी प्रमाणात वापरतील असे प्रमाणित करावे, अशी तरतूद आहे.

(४) भूजल सर्व्हेक्षण यंत्रणा (GSDA) च्या व्याख्येप्रमाणे सेमी क्रिटीकल, क्रिटिकल व ओव्हर एक्स्प्लॉयटेड क्षेत्रामध्ये वैयक्तिक लाभाची विहिर अनुज्ञेय नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी समुदायातील व्यक्तींना कृषी विभागाअंतर्गत योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्याबाबत**

**(१६) ३३६१६ (०७-०१-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी समुदायातील व्यक्तींना कृषी विभागाअंतर्गत योजनांचा लाभ त्वरीत उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, चंद्रपूर यांना दिनांक २१ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२८-०२-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.

(२) चंद्रपूर जिल्हयातून २८,०९१ अर्जाची निवड झाली असून त्यापैकी अनुसूचित जमाती प्रवर्गाचे ७५५६ लाभार्थी आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालय आस्थापनेवरील उपजिल्हाधिकारी संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत**

**(१७) ३३७७३ (१०-०१-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालय आस्थापनेतील उपजिल्हाधिकारी संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. महसुल मंत्री यांना दिनांक २० ऑक्टोंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२५-०२-२०२२) :** (१) व (२)

जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथील आस्थापनेवरील उप जिल्हाधिकारी संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीचे दि.२०.०१.२०२१ अन्वये निवेदन प्राप्त झालेले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे उप जिल्हाधिकारी संवर्गातील १४ पदे मंजूर असून त्यापैकी १३ पदे भरण्यात आलेली आहेत. उप जिल्हाधिकारी संवर्गातील रिक्त पदे बदलीने अथवा पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**चंद्रपूर जिल्हयातील नागरिकांनी अतिक्रमित जागेवर पट्टे मिळण्याची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) ३३७९३ (०७-०१-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील अनेक नागरिकांनी अतिक्रमित जागेवर पट्टे मिळण्याकरिता जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज केले असता सदर प्रक्रियेत मंत्रालयीन स्तरावर अनेक वर्षापासून पट्टे मिळण्याची प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिक्रमित जागेवर पट्टे मिळण्याची प्रकरणे प्रलंबित असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, अतिक्रमित जागेवर पट्टे मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२४-०२-२०२२) :** (१), (२), (३), व (४) चंद्रपूर जिल्हयातील नागरिकांना अतिक्रमित जागेवर पट्टे मिळण्याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयात एकुण ५५ प्रकरणे प्राप्त झालेले असून सदर प्रकरणे मंजुरीस्तव विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर येथे पाठविण्यात आलेले होते. त्यापैकी ५१ प्रकरणे त्रुटी पुर्ततेकरिता जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयास परत करण्यात आलेली आहेत व उर्वरित ४ प्रकरणे विभागीय आयुक्त, कार्यालय नागपूर यांचेकडे मंजुरीकरिता प्रस्तावित आहेत.

त्रुटी पुर्ततेकरिता प्रलंबित असुन त्रुटीची पुर्तता झाल्यावर नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

---

**राज्यातील सरळ मार्गावर ८० टक्क्यांहून अधिक अपघात व मृत्यू होत असल्याबाबत**

**(१९) ३३९३० (०७-०१-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खड्डेमय किंवा वळण रस्त्यापेक्षा सरळ मार्गावर ८० टक्क्यांहून अधिक अपघात व मृत्यू होत असल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सरळ रस्त्यावर वाढत असलेले अपघात व मृत्यू रोखण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२४-०२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील सन २०१९ मध्ये एकूण ३२९२५ अपघात झाले असून त्यापैकी सरळ मार्गावर २५३७० अपघात झाले आहेत.

(२) सरळ रस्त्यावर वाढत असलेले अपघात व मृत्यू रोखण्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत.

• सरळ रस्त्यावर होणारे अपघातांचे प्रमाण कमी करण्याकरिता तसेच अपघातग्रस्तांना वैद्यकिय सेवा उपलब्ध करून देणे हे उद्देश समोर ठेऊन जनजागृतीकरिता जानेवारी महिन्यामध्ये रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते.

• संपूर्ण राज्यातून एकूण १३७७ ब्लॅक स्पॉटची माहिती संकलित करून रस्ते अपघातांचे विश्लेषण करण्यात येऊन सदर ठिकाणी करावयाच्या तातडीच्या, अल्प व दिर्घ मुदतीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

• प्राणांतिक व गंभीर अपघातांचे विश्लेषण करण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत एक अधिकारी व तीन अंमलदार यांचे विशेष पथक निर्माण करण्यात आलेले आहे.

• सर्व महामार्गांवर व रस्त्यांवर जड / अवजड वाहनांना उजवीकडील मार्गिकेमधून मार्गक्रमण करण्यास मनाई करण्याबाबत तसेच सरळ रस्त्यांवरील व घाट मार्गातील वेगमर्यादा निश्चित करण्याबाबत अधिसूचना निर्गमित करून त्याबाबत जनजागृती करण्यात आलेली आहे.

• वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्याकरिता संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये "एक राज्य एक ई चलान" प्रकल्प सुरू करण्यात आलेला आहे.

• अपघात ग्रस्त व्यक्तींना हाताळण्याबाबत महामार्गावरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना रस्ता सुरक्षा विषयक व प्रथमोपचाराबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

• महामार्गावरील अपघातग्रस्तांना गोल्डन अवर मध्ये रुग्णालयात नेण्याकरिता "हायवे मृत्यूंजय दुत" ही योजना राबविण्यात येते.

• मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर वाहतुक कोंडी कमी करण्याकरीता "गोल्डन अवर्स" ही संकल्पना राबविण्यात येत असून शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी सदर महामार्गावर अवजड वाहनांना काही कालावधीसाठी प्रवेश नाकारण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**डहाणू (ता.डहाणू, जि.पालघर) येथील ऐतिहासिक पुरातन किल्ल्याच्या ठिकाणांची शासकीय कार्यालय स्थलांतरित करण्याबाबत**

**(२०) ३४१२२ (०७-०१-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू)** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (ता.डहाणू, जि.पालघर) समुद्र किनाऱ्याच्या बाजुला ३०० वर्षापुर्वी पोर्तुगीजांनी बांधलेल्या ऐतिहासिक पुरातन डहाणू किल्ल्याच्या ठिकाणी तहसिल कार्यालयासह डहाणुचे पोलिस कार्यालय, नागरी पुरवठा कार्यालय, तलाठी कार्यालय, नोंदणी कार्यालय व कस्टम कार्यालय अशी विविध शासकीय कार्यालये स्थापित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यात मोठ्या प्रमाणात शासकीय जागा उपलब्ध असल्यामुळे किल्ल्यावरील शासकीय कार्यालये स्थलांतरीत करुन सदर किल्ल्याचे वैभव पुन्हा प्राप्त करुन देण्याची मागणी नागरीक व पर्यटक यांनी वारंवार करुनही शासनाने कार्यवाही केली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुरातन डहाणू किल्ल्यास गतवैभव प्राप्त करुन देऊन किल्ला पर्यटकांसाठी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने तेथील शासकीय कार्यालये स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०२-०३-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) किल्ल्यामध्ये आजमितीस कार्यरत असलेल्या कार्यालयासाठी अन्य ठिकाणी जागा उपलब्ध झाल्यानंतर किल्ल्यामध्ये कार्यरत असलेल्या कार्यालयांचे स्थलांतर करण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात लाचखोरांविरुद्ध कारवाई करण्याबाबत**

**(२१) ३४१९१ (१०-०१-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात लाचखोरांविरुद्ध दक्षता जनजागृती सप्ताह राबवून गैरव्यवहाराबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ए.सी.बी) यांच्यासोबत संपर्क साधण्याचे दिनांक २७ ऑक्टोबर, २०२० ते २ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास आवाहन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणात सुमारे २२३ लाचखोरांवर निलंबाची कारवाई झाली नसून लाचखोर अधिकारी शासन सेवेत आहेत अशी आकडेवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान समोर आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी लाचखोर अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२४-०२-२०२२) :** (१) होय, खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत दोषी आढाळलेल्या लोकसेवकांबाबत माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये निलंबित न केलेल्या लोकसेवक यांची संख्या २२३ होती. डिसेंबर, २०२० अखेर ती संख्या २३४ होती, तर सद्य:स्थितीत ही संख्या १४८ आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईमध्ये दोषी आढळलेल्या लोकसेवकांना संबंधीत प्रशासकीय विभागामार्फत निलंबित करण्यात येत असते. अशा लोकसेवकांपैकी अद्यापही निलंबित न केलेल्या लोकसेवकांबाबत तातडीने आढावा घेऊन निलंबनाबाबतचा योग्य तो निर्णय घेण्याच्या सुचना मा.मुख्य सचिव यांनी दि. १.१०.२०२१ रोजीच्या बैठकीत सर्व विभागांना दिल्या आहेत. त्यानुसार संबंधित प्रशासकीय विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**बीड जिल्हयातील स्थानिक लोकप्रतिनिधीच्या भूसंपादन आढावा बैठकीत अधिकारी अनुपस्थित असल्याबाबत**

**(२२) ३४२०८ (०७-०१-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील स्थानिक लोकप्रतिनिधीच्या भूसंपादन आढावा बैठकीस अनुपस्थित अधिकारी यांच्याविरुद्ध कार्यवाहीसाठी उपविभागीय अधिकारी, माजलगाव, (जि. बीड) यांनी जिल्हाधिकारी, बीड यांना दिनांक २८ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे अहवाल दिलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी, माजलगाव, (जि. बीड) यांना दिलेल्या अहवालनुसार शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२४-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर बैठकीस अनुपस्थित राहिलेल्या अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन दि. १४.१२.२०२१ च्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. त्यानुषंगाने संबंधित अधिकारी यांचे खुलासे घेऊन आवश्यक ती कारवाई करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
(३) कोविड-१९ चा प्रादुर्भाव असल्याने, टाळेबंदी व कर्मचारी यांची मर्यादीत उपस्थिती, उपजिल्हाधिकारी संवर्गातील प्रशासकीय बदल्या यामुळे प्रकरणात विलंब झाला आहे.

---

**मुंबईतील मुलुंड येथील शासकीय भूखंडावर नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत**

**(२३) ३४३३४ (०७-०१-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुलुंड येथील तहसिलदर कार्यालयाची जागा अपुरी असून अनेक ठिकाणी इमारतीची दयनीय अवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, या न.मु.क्र. ६७६- अ या शासकीय भूखंडावर नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नवीन इमारतीचे बांधकाम कधी सुरु होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२३-०२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त असून प्रस्तावाची छाननी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि. बीड) येथील उप अधीक्षक, भूमीअभिलेख कार्यालयाच्या बांधकामाबाबत

**(२४) ३४६४२ (०७-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि. बीड) येथील उप अधीक्षक भूमीअभिलेख कार्यालय हे मांजरा प्रकल्प परिसरातील इमारतीमध्ये असून सदर कार्यालयातील रेकॉर्ड ठेवण्यासाठी लॉकर आले असुन कार्यालयातील कर्मचारी वर्गास व दैनंदिन कामकाजासाठी येणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठी जागा नसल्यामुळे त्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी तीन मोठे हॉलचे बांधकाम करणे गरजेचे असल्यामुळे त्यासाठी निधी मंजूर करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदरचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (२३-०२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) उप अधिक्षक, भूमि अभिलेख, अंबाजोगाई हे कार्यालय पाटबंधारे विभागाच्या जागेत कार्यरत असून या इमारतीमध्ये कोणताही कायमस्वरुपी बदल न करता तात्पुरत्या स्वरुपात कार्यालयीन कामकाजासाठी वापरण्यास दिलेली आहे. सदर कार्यालयाचे कायमस्वरुपी हस्तांतरीत न केल्यामुळे सदर इमारतीत कोणताही बदल करणे अथवा नवीन बांधकाम करणे वाजवी होणार नाही. सदर इमारत उप अधिक्षक, भूमि अभिलेख, अंबाजोगाई कार्यालयास कायमस्वरुपी हस्तांतरीत करुन इमारत हस्तांतरणाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतरच तीन मोठे हॉल बांधकामाबाबतच्या प्रस्तावास निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा येथे महसूल भवन बांधण्याबाबत

**(२५) ३४८६१ (०७-०१-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा येथील प्रशासकीय इमारत टप्प्पा क्र.२ (महसूल भवन) च्या कामांना मंजूरी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार पुढे कोणता निर्णय घेण्यात आला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (०२-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी, बुलडाणा परिसरामध्ये प्रशासकीय इमारतीचे रुपये १४९२.०० लक्ष रुपयाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरामध्ये सदर प्रशासकीय इमारतीच्या बांधकामानंतर महसूल भवन बांधण्यासाठी जागा शिल्लक राहत नाही. महसूल भवन बांधण्यासाठी इतरत्र जागा उपलब्ध झाल्यास जागेची पाहणी करुन महसूल भवनाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### भिवापूर व उमरेड (जि.नागपूर) तालुक्यात बेरोजगारांची संख्या वाढल्याबाबत

**(२६) ३४९७८ (०७-०१-२०२२). श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवापूर व उमरेड (जि.नागपूर) तालुक्यातील मतदार संघातील भिवापूरात ५६ ग्रामपंचायती असून उमरेड मध्ये ४७ ग्रामपंचायती असल्याने रोजगार हमी योजनेचा एकही पैसा आतापर्यंत खर्च झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उमरेड तालुक्यात ४७ ग्रामपंचायती असून तेथे केवळ एकाही ग्रामपंचायतीमध्ये रोजगार हमी योजनेच्या कामाला यंदा सुरुवात झालेली नाही, तसेच काही तालुक्यातील गावात दीड वर्षापासून १०० दिवसांपेक्षा कमी काम मिळत असल्याने मजूर वर्गात नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२८-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
सन २०२१-२२ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांवर भिवापूर तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये २८८.६४ लक्ष व उमरेड तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये ५११.८९ लक्ष निधी खर्च झालेला आहे.
(२) हे खरे नाही.
सन २०२१-२२ मध्ये उमरेड तालुक्यातील ४७ ग्रामपंचायतीपैकी एका ग्रामपंचायतीमध्ये निधी खर्च झालेला नाही. परंतु उर्वरित ४६ ग्रामपंचायतींमध्ये कामे सुरु आहेत. सर्व मजुरांना किमान १०० दिवसाचा रोजगार पुरविण्यात येतो. जर मजुरांना अधिक काम करण्याची इच्छा असेल तर त्यांना योजनेतील बिहार पॅटर्न अंतर्गत वृक्ष लावगडीच्या कामाव्यतिरिक्त इतर सेल्फ वरील कामावर रोजगार पुरविण्यात येतो. त्यामुळे मजुरांची कोणतीही नाराजी नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जत (जि.सांगली) येथे उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत**

**(२७) ३४९८४ (१०-०१-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) येथे उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयात एकूण २३ पदे मंजूर असुन त्यापैकी अद्यापही १० पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदामुळे शेतक-यांच्या प्रामुख्याने शेतजमीन मोजणीचे काम संथगतीने होत असल्यामुळे सन २०१८ पासुन शेकडो शेतक-यांचे अर्ज व मोजणीच्या प्रतिक्षेत प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय?

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन जत तालुक्यातील उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२४-०२-२०२२) :** (१) होय, खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, जत यांच्या कार्यालयात माहे डिसेंबर, २०२१ अखेर शेत जमीनीचे मोजणीबाबतच्या सर्व प्रकारची एकूण १३०० मोजणी प्रकरणे शिल्लक आहेत.

(३) उप अधीक्षक भूमि अभिलेख जत या कार्यालयात एकूण मंजूर २३ पदांपैकी सद्यस्थितीत १० पदे रिक्त आहेत.

सदर प्रलंबित मोजणी प्रकरणांचा निपटारा करणेकामी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सांगली यांनी त्यांचे स्तरावर योग्य ते नियोजन करुन जिल्ह्यातील अन्य भूमि अभिलेख कार्यालयातील ४ कर्मचाऱ्यांची सेवा मोजणीकामी उपअधीक्षक भूमि अभिलेख, जत यांच्या कार्यालयाकडे वर्ग केलेली आहे.

शासन मान्यतेनुसार भूमि अभिलेख विभागांतर्गत पुणे विभागातील गट क पदसमूह ४ संवर्गातील १६३ पदे सरळ सेवेतून भरण्याबाबत दिनांक ०९.१२.२०२१ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली असून, सदरची भरती प्रक्रिया पुर्ण होताच प्रशासकिय निकड व कामाचा आवाका विचारात घेऊन सर्व कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांचे निराकरण करण्याच्यादृष्टीने गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल पटलावर आणणेबाबत**

**(२८) ३५०२१ (०७-०१-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांचे निराकरण करण्याच्यादृष्टीने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक १२ सप्टेंबर, २०१४ रोजी शासनाने अभ्यास समिती गठीत केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने त्यांच्या शिफारशीसह अहवाल सादर केला असून या अहवालाची शासनस्तरावरून छाननी सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालाची छाननी पूर्ण झाली आहे काय, आणि छाननीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२४-०२-२०२२) :** (१), (२) व (३) होय. हे खरे आहे.

या विभागाच्या शासन परिपत्रक दिनांक १२/९/२०१४ अन्वये, कोकणातील विशेषत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील बेदखल कुळांच्या समस्यांचे सर्वकष अभ्यासाकरिता विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. यासंदर्भात विभागीय आयुक्त यांच्या दिनांक १९/१/२०१७ च्या पत्रान्वये, सदर समितीने अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालावर शासन स्तरावर पुढील कार्यवाही चालू आहे. या अनुषंगाने, शेतमजूर / कारागिर यांच्या राहत्या घराच्या समस्या सोडविण्यासाठी मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम,१९४८ मध्ये अनुषंगिक सुधारणा करण्यात आली असून, त्या अंतर्गत केलेल्या नियमांन्वये क्षेत्रीय स्तरावर अभिलेख तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलकापूर विधानसभा मतदार संघातील मलकापूर व नांदुरा तालुकाअंतर्गत नायब तहसीलदार यांच्या रिक्त असलेल्या पदांबाबत

**(२९) ३५१०८ (०७-०१-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर विधानसभा मतदारसंघाअंतर्गत मलकापूर तहसील मधील नायब तहसीलदार, निवडणूक नायब तहसीलदार, निवासी नायब तहसीलदार तसेच नांदुरा तहसील मधील निवासी नायब तहसीलदार, नायब तहसीलदार महसूल, तसेच संगायो नायब तहसीलदार अशी एकूण ६ नायब तहसीलदार यांच्या जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे दिनांक ४ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मलकापूर व नांदुरा तालुक्यातील सदरहू रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०२-०३-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.
सीपीटीपी-४ अ व सीपीटीपी-५ मधील उपलब्ध उमेदवारांची संख्या विचारात घेवून मलकापूर व नांदूरा तहसिलमधील नायब तहसलदारांची पदे भरण्याचे नियोजित आहे.

---

**वेरळ (ता.लांजा जि.रत्नागिरी) येथील जिल्हा परिषद शाळेच्या परिसरातील जमिनीचा सर्व्हे केल्याबाबत**

**(३०) ३५१३१ (०७-०१-२२) श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेरळ (ता.लांजा जि.रत्नागिरी) येथील जिल्हा परिषद शाळेच्या परिसरातील जमिनीचा सर्व्हे करताना ग्रामपंचायतीला कोणत्याही प्रकारची नोटीस न पाठवता भूमि अभिलेख कार्यालयाने सर्व्हे केल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी, वेरळ ग्रामपंचायतीतील सरपंच व ग्रामस्थ यांनी भूमि अभिलेख कार्यालयासमोर माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (१०-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) मौजे वेरळ, ता. लांजा, जि. रत्नागिरी येथील श्री. चंद्रकांत तुकाराम जाधव यांनी दिनांक ४.२.२०२१ रोजी केलेल्या अर्जानुसार गट नं. ६३४ ब चे मोजणीसाठी अर्जदार यांनी मोजणी फी भरल्यानुसार अतितात्काळ हद्द कायम मो.र.नं २४१८ देण्यात आला आहे. तथापि त्यादिवशी पाऊस असल्यामुळे मोजणी होऊ शकली नाही. दिनांक २५.१०.२०२१ रोजी भुकरमापक मोजणीसाठी जागेवर गेले असता लगत कब्जेदार हजर नसल्याबाबत जबाब पंचनामा भूकरमापक यांनी नोंदविला. तद्नंतर दिनांक २६.१०.२०२१ रोजी मौजे वेरळ गांवचे सरपंच व इतर यांनी आक्षेप घेतला असता अर्जदार यांना क प्रत न पुरविता प्रकरण तुर्त स्थगित ठेवण्यात आले. मोजणीसाठी नव्याने दिनांक २१.१२.२०२१ रोजी तारिख देण्यात आली. मात्र तांत्रिक अडचणीमुळे जागेवर हद्दीच्या खुणा दाखविता आल्या नाहीत. दिनांक २०.१.२०२२ रोजी आगावू नोटीसीने दिनांक २१.१.२०२२ रोजी प्रत्यक्ष जागेवर मोजणी करण्यात आली व अर्जदार व लगत कब्जेदार यांना हद्दीच्या खुणा मान्य असलेबाबत जबाब नोंदविण्यात आला आहे. त्याचबरोबर अर्जदार यांना “क” प्रत पुरविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड तहसिल (ता.जि.बीड) कार्यालयातील कर्मचाऱ्यांविरुध्द खातेनिहाय चौकशी होऊन कारवाई करण्याबाबत**

**(३१) ३५१८३ (०७-०१-२०२२). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड (ता.जि.बीड) तहसिल कार्यालयामध्ये अव्वल कारकून व महसूल सहाय्यक पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांविरुध्द मागील वर्षभरात नागरिकांच्या तक्रारी असून वारंवार पैशाची मागणी करुन त्याची पूर्तता न करणाऱ्या नागरिकांच्या कामाची अडवणूक करुन त्रास देत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसिलदार कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची कामे अडवून त्यांचेशी उध्दट वर्तन करुन लोकप्रतिनिधी व पदाधिकारी यांना देखील कमी लेखून अवमानजनक भाषा वापरुन वारंवार कार्यालयीन शिस्त व नेमून दिलेली जबाबदारी पार न पाडता त्यांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांविरुध्द बाह्य यंत्रणेमार्फत खातेनिहाय चौकशी करुन त्यांचेवर तातडीने कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य महोदयांकडे दिनांक ३ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्र-निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने बीड तहसिल कार्यालयातील अपमानजनक वागणूक देणाऱ्या दोन्ही कर्मचाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (०२-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) होय हे खरे आहे.

(४) मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दि.०३.१०.२०२१ रोजीच्या निवेदनावर तपासून सादर करण्याच्या सूचना मा.मंत्री (महसूल) यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांस दिल्या असून सदर सूचनांनुसार चौकशीअंती संबंधित अव्वल कारकून व महसूल सहाय्यक यांनी नागरिकांची कामे अडवून त्यांचेशी उद्धट वर्तन करुन लोकप्रतिनिधी व पदाधिकारी यांना कमी लेखून अवमानजनक भाषा वापरणे व आर्थिक गैरव्यवहार केल्याचे आढ़ळून आले नसल्याचे किंवा तसा सबळ पूरावा नसल्याचे जिल्हाधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देसाईगंज, (जि. गडचिरोली) येथे दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(३२) ३५१९३ (०७-०१-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देसाईगंज (जि. गडचिरोली) हे उपविभागाचे शहर असुन येथे दुय्यम निबंधक कार्यालय नसल्यामुळे शेतकरी व नागरीकांना जमिन खरेदी-विक्रीची नोंदणी करण्याकरिता लांब अंतरावरील आरमोरी येथे जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी व नागरीकांच्या समस्यांची दखल घेवुन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य महोदयांना दिलेल्या निवेदनावर मंत्री महोदयांनी अप्पर मुख्य सचिव, महसुल विभाग यांना प्राधान्याने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन देसाईगंज येथे दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (०२-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे
(३) देसाईगंज येथे दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्याबाबत केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने, दुय्यम निबंधक, आरमोरी कार्यालयातील तसेच देसाईगंज (वडसा) कार्यक्षेत्रातील मागील ५ वर्षातील एकूण दस्तसंख्या खालीलप्रमाणे : -

| वर्ष | एकूण दस्त संख्या ता.आरमोरी+देसाईगंज+कोरची | तहसिल देसाईगंज (वडसा) अंतर्गत कार्यक्षेत्रातील दस्त संख्या |
|---|---|---|
| २०१७ | १०५० | ५९३ |
| २०१८ | १२४८ | ६१५ |
| २०१९ | १४२८ | ६३० |
| २०२० | १०९० | ५२० |
| २०२१ | १३५० | ५४० |

दुय्यम निबंधक कार्यालयात वर्षाला साधारणत: ८००० पेक्षा जास्त दस्त नोंदणीसाठी दाखल झाल्यास त्याक्षेत्रात नवीन कार्यालयाची निर्मिती करावी असे शासन निर्णय दि.२६.०२.२०१४ अन्वये धोरण निश्चित केले आहे. सदर धोरण निश्चितीनुसार दुय्यम निबंधक, आरमोरी कार्यालयातील तसेच मौजा देसाईगंज कार्यक्षेत्रातील मिळकतीच्या पाच वर्षातील दस्त नोंदणीची संख्या अत्यल्प असल्याने मौजा देसाईगंज (वडसा) येथे नवीन दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करणे उचित होणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाझर तलाव मोरफळ (ता.पारोळा जि.जळगांव) येथे जुन्या रोजगार हमी योजना पूर्ण करण्यासाठी सुधारित अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(३३) ३५३०१ (०५-०१-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाझर तलाव मोरफळ (ता.पारोळा जि.जळगांव) या कामास जुन्या रोजगार हमी योजना पूर्ण करण्यासाठी सुधारित अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांच्यामार्फत दिनांक २१ मे, २०१४ रोजी वा त्यासुमारास नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोरफळ हे गांव अवर्णन प्रवण क्षेत्रात येत असल्यामुळे तलावाच्या अप्रत्यक्ष सिंचनामुळे या भागातील शेतीसाठी पाणी उपलब्ध होवू शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे काय वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,
(४) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम प्राधान्याने हाती घेवून पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२८-०२-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.
(२) नाही.
(३) सदर कामावर झालेला खर्च हा सुधारित अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १०% पेक्षा कमी असल्याने सदर काम रोजगार हमी योजनेतून वगळण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथे ऑनलाईन केवाईसी अपडेट करण्याच्या बहाण्याने फसवणूक केल्याबाबत**

**(३४) ३५३४३ (०७-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथे ऑनलाईन केवाईसी अपडेट करण्याच्या बहाण्याने बँक खातेदारांची फसवणूक केली जात असल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर सायबर क्राईम रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२८-०२-२०२२) :** (१) ऑनलाईन केवाईसी अपडेट करण्याच्या बहाण्याने पोलीस आयुक्त, नागपूर शहर अंतर्गत दि.२८.०५.२०२१ रोजी तसेच पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या अंतर्गत दि.०३.०८.२०२१ रोजी प्रत्येकी ०१ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) पोलीस आयुक्त, नागपूर शहर अंतर्गत एम.आय.डी.सी., पोलीस ठाणे येथे अनोळखी मोबाईल धारकाविरूध्द गु.र.क्र.२७३/२०२१, कलम ४२० भा.दं.वि. सह, कलम ६६(ड) माहिती तंत्रज्ञान (सुधारणा) अधिनियम, २००८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दि.१३.०१.२०२२ रोजी अ समरी दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण अंतर्गत कळमेश्वर पोलीस ठाणे येथे अनोळखी मोबाईल धारकाविरूध्द गु.र.क्र.४३७/२०२१, कलम ४१९,४२० भा.दं.वि. सह, कलम ६६(ड) माहिती तंत्रज्ञान (सुधारणा) अधिनियम, २००८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्यात सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरीता ४३ सायबर पोलीस ठाणी उभारण्यात आली आहेत. तसेच मुंबई पोलीस आयुक्तालयात प्रादेशिक स्तरावर ५ सायबर पोलीस ठाणी उभारण्यात आली आहेत. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्याकरीता विविध पोलीस घटकातील एकूण ३२५३ पोलीस अधिकारी व अंमलदारांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. याशिवाय दीर्घकालीन प्रशिक्षणाचा विशेष अभ्यासक्रम तयार करून एकूण १९२२ अधिकारी व अंमलदार यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सर्व सायबर पोलीस ठाण्यांना गुन्ह्याच्या तपासाकरीता अत्याधुनिक यंत्रसामग्री, विविध प्रकारचे १६ टूल्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत

१००० पोलीसांना सायबर गुन्ह्यांच्या तपासात मदत व्हावी यासाठी तज्ञ सल्लागारांच्या मदतीने फॉरेन्सिक टूल्सचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे. संभाव्य सायबर गुन्हे टाळण्यासाठी जनजागरुकता शिबिरे घेतली जातात. तसेच सोशल मिडियाद्वारे, इंटरनेट माध्यमांद्वारे देखील सर्व सामान्य नागरिकांना सायबर गुन्ह्याच्या अनुषंगाने सावध राहण्याचे आवाहन केले जाते. सायबर गुन्हयांना आळा घालण्यासाठी मार्गदर्शिका (अॅडवायझरी) प्रसारित करून सायबर गुन्ह्यांबाबत माहिती दिली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयात भूमि अभिलेख विभागाच्या चुकीने शेतकरी अडचणीत आल्याबाबत**

**(३५) ३५३६२ (१०-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील भूमी अभिलेख विभागाने सर्वेक्षणातून जवळपास २७ शेतक-यांच्या मालकीच्या जमिनीच्या गटावर नगरमान रद्द असे नमुद केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे २७ शेतकरी ऑनलाईन सातबारापासून वंचित राहिल्याने मागील ५ वर्षापासून नुकसानग्रस्त शेतकरी शेतमाल विक्रीपासून, विविध योजनांचा लाभापासून वंचित राहिले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२८-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) गोंदिया जिल्हयातील भूमी अभिलेख विभागाने पुनर्मोजणी नंतर मौजा-एकोडी येथील २६ शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमीनीच्या गटांच्या ७/१२ वर नगर मापन हद्द असे नमूद आहे. नगर भूमापन रद्द असे नमूद नाही.

(३) गोंदिया जिल्हयातील, गोंदिया तालुक्यातील मौजा एकोडी या गावास सन १९८१-१९८२ मध्ये नगर भूमापन योजना लागू झाली आहे. तसेच मौजा एकोडी या गावात सन १९९४-९५ मध्ये पुनर्मोजणी योजना लागू झालेली आहे. मौजे एकोडी येथील २६ गटाचे ७/१२ अभिलेखावर इतर अधिकाराचे रकान्यात नगर भूमापन हद्द असे नमूद केले आहे. उप अधिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया यांचेकडून ७/१२ बंद करणेबाबत कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही. उलट उप अधिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया यांनी दिनांक ३.१.२०१९ व दिनांक २८.९.२०२१ चे पत्रान्वये मौजे एकोडी येथील २६ गटाचे ७/१२ अभिलेख संगणकीकरणबाबत तहसिलदार, गोंदिया ग्रामीण यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार तहसिलदार, गोंदिया ग्रामीण यांनी दिनांक ३.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये २६ गटांचे ७/१२ संगणकीकरणास परवानगी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे) तालुक्यात उल्हासनगर कॅम्प नंबर १,२, आणि ३ साठी नवी दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्याबाबत

**(३६) ३५४५५ (०७-०१-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) तालुक्यातील उल्हासनगर नंबर ५ येथे एकच दुय्यम निबंधक कार्यालय असून येथे जाण्यासाठी नागरिकांना त्रास होत असल्यामुळे उल्हासनगर १, २, आणि ३ साठी नवीन दुय्यम निबंधक कार्यालय सुरू करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक, पुणे यांना निवदेनाद्वारे दिनांक ३० जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर १ ते उल्हासनगर ५ यामधील अंतर जास्त असून उल्हासनगर १, २, व ३ ह्या विभागात जास्त लोकसंख्या असल्यामुळे नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर नोंदणी होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कॅम्प नंबर १, २ आणि ३ विभागातील नागरिक उल्हासनगर ५ येथे जात असल्यामुळे कार्यालयात गर्दी होत असून नागरिकांच्या कामाला उशीर होत असून एक दस्त नोंदणी करण्याकरिता ३ ते ४ दिवस जावे लागत असल्यामुळे जेष्ठ नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवीन दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (०२-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

उल्हासनगर १ ते उल्हासनगर ५ यामधील अंतर जास्त नाही. ठाणे जिल्हयातील उल्हासनगर तालुका कार्यक्षेत्राकरिता सह दुय्यम निबंधक, उल्हासनगर क्र.१ हे कार्यालय कार्यरत आहे. त्यात अंतर्भूत महापालिका क्षेत्रातील कॅम्प क्र.१,२,३,४ व ५ पैकी कॅम्प क्र.५ येथे सह दुय्यम निबंधक, उल्हासनगर क्र.१ हे कार्यालय कार्यरत आहे. सदर कार्यालय हे उल्हासनगर कॅम्प क्र.५ तहसिलदार कार्यालयाचे आवारामध्ये आहे. आजुबाजुला सर्व शासकीय कार्यालये आहेत. उल्हानगर कॅम्प क्र.१, २ व ३ हे विभाग सद्य:स्थितीत कार्यालयापासून सुमारे ५ कि.मी. क्षेत्र परिघात स्थित आहेत. त्यामुळे संपूर्ण उल्हासनगर तालुक्यातील मिळकतीच्या दस्ताची नोंदणी सह दुय्यम निबंधक, उल्हासनगर क्र.१ कार्यालयात होते.

सह दुय्यम निबंधक, उल्हासनगर क्र.१ कार्यालयात दस्त नोंदणी सरासरी वार्षिक २५०० व मासिक १२५ ते १५० इतकी होत आहे. त्यामुळे सदर कार्यालयात दस्त नोंदणीकरिता नागरिकांची गर्दी होत असल्याने नागरिकांच्या कामाला उशिर होत आहे, ही बाब खरी नाही.

४) दुय्यम निबंधक कार्यालयात वर्षाला साधारणत: ८००० पेक्षा जास्त दस्त नोंदणीसाठी दाखल झाल्यास त्याक्षेत्रात नवीन कार्यालयाची निर्मिती करावी असे शासन निर्णय दि.२६.०२.२०१४

अन्वये धोरण निश्चित केले आहे. सदर धोरण निश्चितीनुसार दुय्यम निबंधक, उल्हासनगर क्र.१ कार्यालयातील दस्त नोंदणी सरासरी वार्षिक २५०० व मासिक १२५ ते १५० इतकी अल्यल्प होत आहे. त्यामुळे उल्हासनगर क्षेत्राकरिता दुसरे नवीन दुय्यम निबंधक कार्यालय मंजूर करणे उचित होणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौंड (जि.पुणे) विधानसभा मतदार संघातील शिव व पाणंद रस्ते करण्यासाठी रोजगार हमी योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३७) ३५४८२ (०७-०१-२०२२). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) विधानसभा मतदार संघात सुमारे १०० किमीहून अधिक लांबीचे शिव व पाणंद रस्ते अस्तित्वात असून निधी अभावी त्याचे काम होऊ शकलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्यांच्या कामासाठी सुमारे २५ कोटी रुपयांचा निधी मिळावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कामांना निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२८-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) दि. ११/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार शेत/पाणंद रस्त्यांचे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अल्पभूधारक शेतक-यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीरीकरीता नमुद केलेली अट शिथील करण्याबाबत**

**(३८) ३५५२९ (०७-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अल्पभूधारक शेतक-यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीरीकरीता नमुद केलेली ५०० फुटाची अट ही महाराष्ट्र भूजल (विकास व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील निश्चित केलेल्या तरतूद शिथील करुन दोन विहीरींमधील ५०० फुट अंतराची अट शिथील करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी रोजगार हमी योजना मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ३ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी अट रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री. संदीपानराव भुमरे (०२-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

दि.२१ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहिर मंजूर करतांना दोन विहिरींमधील अंतर किमान १५० मीटर असावे, अशी तरतूद आहे.

(२) सदर प्रकरणी कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सहाय्यक पोलीस निरीक्षकावर लाचलुचपत विभागाने केलेल्या कारवाईबाबत**

**(३९) ३५६२४ (०७-०१-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने एक लाख रुपयांची लाच स्वीकारताना सहाय्यक पोलीस निरीक्षकावर कारवाई केल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमिन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात फसवणूक झाल्याच्या गुन्ह्यात जामिनाला विरोध न करण्यासाठी लाच घेण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२४-०२-२०२२) :**(१) होय, खरे आहे.

(२) होय, खरे आहे

(३) या प्रकरणी विमानतळ पोलीस स्टेशन, पुणे शहर, गु.रजि. नं. २७८/२०२१ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, ७अ, १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचे कामी आरोपी लोकसेवक सहायक पोलीस निरीक्षक व खाजगी इसम यांना दि. ९.९.२०२१ रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच अन्य आरोपी लोकसवेक पोलीस शिपाई यांना दि. १३.९.२०२१ रोजी अटक करण्यात आली आहे. पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही

---

**सोलापूर जिल्हयात रोजगार हमी योजनेच्या कामास दिरंगाई होत असल्याबाबत**

**(४०) ३५८७३ (१०-०१-२०२२). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारची व महाराष्ट्र शासनाची महत्वाकांक्षी योजना म्हणून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु केली, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, ज्यांचे वय १८ वर्षे पूर्ण झालेल्या ग्रामीण भागातील गरीब लोकांना एका वर्षात १०० दिवस रोजगार दिल्याचे तसेच अकुशल काम करणाऱ्या जॉब कार्डधारक व्यक्तीने कामाची मागणी केल्यावर १५ दिवसांच्या आत काम दिले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात कामांना मजूरी मिळत नाही कारण या योजनेत मजूरांना प्रतिदिन २४८ रुपयांची मजूरी दिली जाते ही मजूरी तुटपूंजी असल्याने प्रतिवर्षी पाच ते सहा रुपयांची वाढ होत असल्यामुळे जिल्ह्यात फक्त ८५२ कामांवर ३५१६ मजूर काम करत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर खाजगी कामांवरती कमीत कमी ४०० ते ५०० रुपयांची प्रतिदिन मजुरी मिळाल्यामुळे रोजगार हमी योजनेकडे मजूरांचा येण्याचा कल कमी झाल्याने योजनेचे काम होण्यास दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त योजनेंतर्गत मजूरी करणा-या लोकांना मजूरी वाढवून मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०२-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. केंद्र शासन प्रत्येक आर्थिक वर्षासाठी राज्याकरिता प्रतिदिन मजूरी ठरवून देते. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाने दि.१५ मार्च, २०२१ च्या अधिसूचनेन्वये रु.२४८/प्रति दिन असा दर निश्चित करुन दिलेला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील सिंचन विहीर योजनेची कामे मंजूरीस दिरंगाई झाल्याबाबत

**(४१) ३५८९३ (१०-०१-२०२२). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने अल्पभूधारकांना तसेच रोजगारांना संधी उपलब्ध होण्यासाठी शासनाच्या महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून अहिल्यादेवी सिंचन विहीर योजनेअंतर्गत अधिकाधिक शेती सिंचनाखाली येण्यासाठी सुरु करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लोकससंख्येच्या प्रमाणात विहिरी मंजूरीचे परिपत्रक काढले असून १५०० पर्यंत लोकसंख्येच्या गावात ५, तीन हजार लोकसंख्येच्या गावात १०, पाच हजार लोकसंख्येच्या गावात १५ व पाच हजार लोकसंख्येपेक्षा असलेल्या गावात २० विहिरी मंजूर करण्यास शासनाने दिनांक २८ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास मान्यता दिली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे त्या योजनेला अपेक्षीत गती मिळत नसल्याने शेतकऱ्यांची मागणी असतानाही अटी, नियमामध्ये अडवणूक करुन शेतकरी विहिरीच्या खोदकामांपासून वंचित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०२-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भारतीय कृषी धोरणाच्या पोल्ट्री उद्योगाला मदतीकरिता नवीन धोरण ठरविण्याबाबत**

**(४२) ३५९१८ (१०-०१-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतीय कृषि क्षेत्राचा अविभाज्य घटक असलेल्या पोल्ट्री उद्योगाला गेल्या दीड महिन्यांपासून सातत्याने अडचणींना सामना करावा लागत असल्यामुळे पोल्ट्री उद्योगाला मदतीसाठी नवीन धोरण ठरविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोल्ट्री उद्योगाचे कोरोनामुळे नुकसान होत असुन पोल्ट्री उद्योगाकरिता शासनाने त्यांच्या मागण्या मान्य करुन नवीन धोरण ठविण्याची मागणी महाराष्ट्र राज्य पोल्ट्री फार्मर्स ॲण्ड ब्रिडर असोसिएशने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (२८-०२-२०२२) :** (१) असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(२) निवेदन प्राप्त झालेले आहे.
(३) कुक्कुट पालन हा खाजगी व्यवसाय असून या बाबत आर्थिक मदतीचे शासनाचे कोणतेही धोरण नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिमूर (जि.चंद्रपूर) येथील तहसील कार्यालयातील महसूल व पुरवठा विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४३) ३५९४१ (०७-०१-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिमूर (जि.चंद्रपूर) येथील तहसील कार्यालयातील तहसीदार १, नायाब तहसीलदार २, अव्वल कारकून ३, महसूल सहाय्यक ८, शिपाई २ तसेच पुरवठा विभागात अव्वल कारकुन १, लिपिक ३, शिपाई ४ असे महसूल व पुरवठा विभागातील एकुण ४२ मंजूर पदांपैकी एकूण २४ पदे गेल्या अनेक दिवसांपासून रिक्त असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिमूर (जि.चंद्रपूर) तालुका हा सर्वात मोठा तालुका असून अत्यल्प कर्मचारी असल्यामुळे अनेक कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत तसेच रिक्त पदे तात्काळ भरण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२४-०२-२०२२) :** (१), (२) व (३) चिमूर (जि. चंद्रपूर) तालुक्यातील तहसील कार्यालयात महसूल विभागाची २९ व पुरवठा विभागाची १४ अशी एकूण ४३ पदे मंजूर असून त्यापैकी महसूल विभागाची ९ व पुरवठा विभागाची एकुण ६ अशी एकूण १५ पदे रिक्त आहेत. अव्वल कारकून व महसूल सहायक यांचेकडे अतिरिक्त कार्यभार देऊन प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यात येत आहे.

नायब तहसिलदार संवर्गातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने सन २०२१-२२ च्या निवडसूचीत १४८ अधिका-यांना पदोन्नती देण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे.

वित्त विभाग,शासन निर्णय दि.४ मे २०२० अन्वये कोविड-१९ या संसर्गजन्य रोगामुळे अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वितीय उपाययोजना करण्याचा निर्णय घेतलेला असून त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग वगळता इतर सर्व विभागाच्या पदभरतीवर निर्बंध लावलेले आहेत. त्यामुळे चिमूर (जि. चंद्रपूर) तालुक्यातील तहसील कार्यालयातील महसूल व पुरवठा विभागाची गट-क व गट-ड संवर्गाची एकूण १३ पदे रिक्त आहेत. तथापि,जिल्हा स्तरावर अनुकंपा तत्वानुसार महसूल सहायक पद भरती प्रक्रिया सुरु असून माहे, मार्च, २०२२ अखेर महसूल सहायकांची रिक्त पदे भरण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे तालुक्यातील भूमी अभिलेख उपअधीक्षक कार्यालयातील रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत**

**(४४) ३६०५० (०७-०१-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे भूमी अभिलेख उपअधीक्षक कार्यालयातील विविध पदे रिक्त असल्यामुळे नागरिकांच्या कामाला विलंब होवुन कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण पडत असल्याने रिक्त पदे भरण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याची मागणी नागरिकांकडुन होत असल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मंगळवेढा भुमी अभिलेख उप अधीक्षक कार्यालयात किती पदे रिक्त आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मंगळवेढा तालुक्यातील भूमी अभिलेख उपअधीक्षक कार्यालयातील रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२४-०२-२०२२) :** (१) होय, खरे आहे.
(२) उप अधीक्षक भूमि अभिलेख, मंगळवेढा या कार्यालयात एकूण मंजूर २१ पदांपैकी सद्यस्थितीत ६ पदे रिक्त आहेत.
(३) शासन मान्यतेनुसार भूमि अभिलेख विभागांतर्गत पुणे विभागातील गट क पदसमूह ४ संवर्गातील १६३ पदे सरळ सेवेतून भरण्याबाबत दिनांक ०९.१२.२०२१ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली असून, सदरची भरती प्रक्रिया पुर्ण होताच प्रशासकिय निकड व कामाचा आवाका विचारात घेऊन सर्व कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्हयात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून करण्यात येणा-या रस्त्यांची कामे बंद करण्यात आल्याबाबत

**(४५) ३६१०९ (१०-०१-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून करण्यात येणाऱ्या रस्त्यांची कामे सन २०१८ या कालावधीपासून बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामामध्ये तक्रारी होत असल्याने सदरची कामे या योजनेत करण्यात येऊ नये असा आदेश क्र.कक्ष/२१/रोहयो/इ.सि./कावी/६८५/२०१८, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ नुसार तत्कालीन जिल्हाधिकारी, अकोला यांनी निर्गमित केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी रस्त्यांच्या कामाबाबत शासनाने कोणती भूमिका घेतली वा घेण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२८-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही
(२) हे खरे नाही,
शासन निर्णय दि.२७/०२/२०१४ नुसार दिलेले निर्देश व टाईप इस्टीमेट चा अवलंबकरुन मग्रारो हमी योजने मधुन शेत/पाणंद रस्त्यांची कामे करण्याचे निदेश सदर पत्रान्वये देण्यात आले आहेत.
(३) राज्य रोहयो आणि मनरेगा यांचा अभिसरणातुन शेत/पाणंद रस्त्यांच्या कामा करीता पूरक कुशल निधी उपलब्ध करुन देण्याकरीता सुधारीत धोरण शासन निर्णय दि.११/११/२०२१ अन्वये विहीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील मोर्शी उपविभागात पालकमंत्री पाणंद रस्त्यांच्या मातीकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४६) ३६११९ (१०-०१-२०२२). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालकमंत्री पाणंद रस्ते योजना सन २०२०-२१ या कालावधीत प्रशासकीय मंजुरी प्राप्त

असलेल्या रु.१,२७,९१,५२५/- रक्कमेच्या पाणंद रस्त्यांच्या कामास उपविभागीय अधिकारी, मोर्शी यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये निधीची मागणी करुनही उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी हेतुपुरस्सर केवळ मोर्शी उपविभाग वगळून इतर उप विभागास निधी उपलब्ध करुन दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संत्रा पिकाची प्रचंड मोठ्या प्रमाणावर लागवड असलेल्या अमरावती जिल्ह्यातील मोर्शी, वरुड तालुक्यात ग्रामीण भागातील पाणंद रस्ते शरीरात रक्तवाहिन्यांप्रमाणे अतिमहत्वाचे असल्याने आणि प्रशासकीय मंजुरीनंतर कंत्राटदारांनी करारनाम्यानुसार पाणंद रस्त्याचे काम पूर्ण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी फक्त मोर्शी उपविभाग वगळून इतर उप विभागास निधी उपलब्ध करुन दिल्याने मोर्शी तालुक्यातील पाणंद रस्त्यांचे काम करणारे कंत्राटदार तथा संत्रा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये असलेला तीव्र रोष लक्षात घेता, शासनाने प्रशासकीय मंजुरी असलेला पाणंद रस्त्यांस निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत व देण्यास टाळाटाळ करणाऱ्या उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचेविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२८-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये**
**सहयोगी संस्था म्हणून अर्ज केल्याबाबत**

**(४७) ३६५८१ (१०-०१-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजना शासन निर्णय दिनांक १३ जानेवारी, २०२१ नुसार राज्य शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये CSO/FPO/CBO/NGO ची अखर्चिक भागीदारीकरिता, जिल्हाधिकारी, जळगांव यांनी वृत्तपत्रामध्ये नोंदणीकृत सामाजिक संस्थांना रोजगार हमी योजनेसाठी सहयोगी संस्था म्हणून दिनांक १६ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास अर्ज करण्याचे आवाहन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त केलेल्या आवाहनानुसार किती नोंदणीकृत सामाजिक संस्थांनी सहयोगी संस्था म्हणून स्वीकृती देण्याबाबत आतापर्यंत अर्ज केले आहेत,

(३) असल्यास, नोंदणीकृत सामाजिक संस्थांनी सहयोगी संस्था म्हणून स्वीकृत अर्ज केल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२८-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आतापर्यंत एकुण १५ सामाजिक संस्थांचे सहयोगी संस्था म्हणुन स्वीकृती देण्याबाबतचे अर्ज जिल्हाधिकारी, जळगांव कार्यालयास प्राप्त झाले आहेत.

(३) १) शासन निर्णयातील तरतूदीनुसार जिल्हयाची स्थानिक परिस्थिती बघतां प्राधान्यक्रम ठरवून एक प्रकारचे कामासाठी एक किंवा अधिक स्वयंसेवी संस्थांना काम करण्यांस परवानगी देण्यांबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

२) शासन निर्णयातील मास्टर सर्कुलर २०२०-२१ नुसार अर्ज केलेल्या स्वयंसेवी संस्थांना निती आयोगाच्या NGO-PS Module अंतर्गत नोंदणी करणेबाबत सूचित केले असून सदर सामाजिक संस्थांना मगांराग्रारोहयो ची सामाजिक संस्था म्हणून सहभागी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई- वडोदरा या आठ पदरी द्रुतगती महामार्गाकरिता पालघर जिल्हयातील जमिनीचे भूसंपादन करण्यात आल्याबाबत

**(४८) ३६६०३ (०६-०१-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई- वडोदरा या आठ पदरी द्रुतगती महामार्गाकरिता पालघर जिल्हयातील आवश्यक भूसंपादनाचे काम सुरू असून सुमारे ९०१ हेक्टर जमिनीचे संपादन करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावित महामार्गाच्या भूसंपादनासाठी गरीब, अशिक्षित जमीन मालकांच्या अज्ञानाचा फायदा घेवुन संपादीत जमिनीचा मोबदला मिळवून देण्यासाठी महसूल विभागाच्या शासकीय अधिकाऱ्यांबरोबर दलालांच्या अनेक टोळ्या डहाणू, बोईसर, पालघर या भागात सक्रिय झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने दोषी असलेल्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१८-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

मुंबई वडोदरा द्रुतगती महामार्गासाठी एकूण ९७८.९ हे.आर. जमीनीचे भुसंपादन पालघर जिल्हयात करण्यात आले आहे.

(२) अशी बाब नाही.

अशा स्वरूपाची कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे आढळून येते.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**कोरेगाव - भीमा प्रकरणाची सुनावणी घेणाऱ्या आयोगाने पर्यायी जागा उपलब्ध करुन न दिल्याबाबत**

**(४९) ३६६४९ (१०-०१-२०२२). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगाव-भीमा प्रकरणाची सुनावणी घेणाऱ्या आयोगाने त्यांना पुरविण्यात आलेल्या सध्याच्या जागेमध्ये कोविड-१९ च्या नियमांचे पालन करणे अवघड होत असल्यामुळे पर्यायी जागेची मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत गृह विभागाचे मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी पर्यायी जागेसंदर्भातील मुद्दा मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयात उपस्थित करुन जागा उपलब्ध करुन देण्याबाबत आयोगाच्या अध्यक्षांनी सुचविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पर्यायी जागा विहीत वेळेत उपलब्ध करु न दिल्यामुळे आयोगाने कोरेगाव-भीमा प्रकरणाची सुनावणी थांबवली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त आयोगाने पर्यायी जागा तसेच मूलभूत सोयी सुविधा-उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२८-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) कोविड- १९ च्या नियमांचे पालन करणे शक्य व्हावे यासाठी सह्याद्री राज्य अतिथीगृह अथवा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, मुंबई येथे एक ऑडीटोरियम हॉल व दोन सुट्स आयोगाला उपलब्ध करुन देण्याबाबत आयोगाने दि.२३/१०/२०२१ च्या पत्राव्दारे शासनास विनंती केली होती.

त्यानुसार, गृह विभागाकडून सामान्य प्रशासन विभागाकडे दि.२५/१०/२०२१ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला होता, सदर प्रस्तावास सामान्य प्रशासन विभागाकडे प्रलंबित असताना आयोगाने दि.३१/१०/२०२१ पर्यंत सह्याद्री अतिथीगृहाच्या उपलब्धतेबाबत न कळविल्यामुळे दि.०८/११/२०२१ ते दि.१२/११/२०२१ या कालावधी दरम्यानच्या सुनावण्या रद्द करण्यात येत असल्याचे गृह विभागास कळविले आहे.

तद्नंतर आयोगाने दि.०८/११/२०२१ च्या पत्रानुसार दि.१५/११/२०२१ ते दि.२०/११/२०२१ या कालावधी दरम्यान सुनावण्या आयोजित करण्यासाठी सह्याद्री राज्य अतिथीगृह उपलब्ध करुन देण्याबाबत शासनास पुन्हा विनंती केली होती.

त्यावर शासनाने सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घेऊन दि.१०/११/२०२१ च्या पत्रानुसार आयोगाच्या दि.१५/११/२०२१ ते दि.२०/११/२०२१ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या सुनावण्यांसाठी सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे जागा उपलब्ध करुन दिली आहे. या कालावधी दरम्यान आयोगाने सुनावण्या घेतल्या आहे.

त्यानंतर आयोगाने दि.१३/१२/२०२१ ते दि.१८/१२/२०२१ या कालावधीमध्ये सुध्दा सह्याद्री अतिथिगृह येथे जागा उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे, त्यानुसार आयोगास दि.१३/१२/२०२१ ते दि.१८/१२/२०२१ या कालावधीमध्ये सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आली असून, त्यानुसार आयोगाने सुनावण्या घेतल्या आहेत. आहे.

(४) आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये कोविड-१९ च्या नियमांचे पालन करुन सुनावण्या घेणे शक्य होत नसल्यामुळे, आयोगाला सह्याद्री राज्य अतिथीगृहातील हॉल उपलब्ध करुन देण्यात आले आहेत, तसेच पुणे येथील कार्यालयामध्ये ऑनलाईन सुनावण्या घेण्याकरीता व्हिडीओ कॉन्फरंसिंग कॅमेरा व त्यासाठी आवश्यक असलेले इतर उपकरणे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील कृषी भवनाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत**

**(५०) ३७६३८ (२६-१२-२०२१). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील झेंडा पार्कमधील पावणे तीन एकर जागेवर कृषी विभागाशी संबंधित असलेल्या सर्व कार्यालयांसाठी एकाच ठिकाणी कृषी भवन मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कृषी भवनाचे भूमिपुजन अडीच वर्षापुर्वी होवूनही अद्याप कामाला सुरुवात झालेली नसुन यासाठी सुमारे २९ कोटी ८० लाख रुपये मंजूर झाले असताना प्रत्यक्षात तरतूद करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कृषी भवनाच्या कामास निधी उपलब्ध करुन कृषीभवनाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२१-०२-२०२२) :** (१) (२) व (३) करिता
कोल्हापूर येथे कृषि भवन उभारण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या अधिनस्त असलेल्या सहयोगी अधिष्ठाता, राजर्षी शाहु महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथील स.नं.६०४ मधील १.१४ हे. इतकी जमीन हस्तांतरित करण्यास दि.२९.१२.२०१८ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार तत्कालीन मा.मंत्री (कृषि) यांच्या हस्ते सदर कामाचे भूमीपूजन संपन्न झाले आहे.
कोल्हापूर येथे कृषि भवन उभारण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून कोविड-१९ मुळे निधीची अत्यल्प उपलब्धता लक्षात घेता अद्याप प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.